# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्र. 65/2024 दिनांक : 18.02.2024

## 1)घरफोडी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 08.02.2024 रोजी 18.00 वा. ते दिनांक 11.02.2024 रोजी 14.30 वा. चे दरम्यान, **वेदांत नगर मालेगाव रोड तरोडा खु. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे कुंटूबासह घराला कुलुप लावुन पुणे येथे गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे मुख्य दरवाज्याचे कडी कोंडा कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी पेटीमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने एकुण किंमती 9,30,000/–रू. चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी संजय गुंडप्पा घाडे, वय 54 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. वेदांत नगर मालेगाव रोड तरोडा खु.जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 49/2024 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री शिंगनवाड, मो. नं. 7588526833** हे करीत आहेत.

## 2)अपघात :–

**मुदखेड :–** दिनांक 16.02.2024 रोजी 15.10 वा. चे दरम्यान, **बारड ते मुदखेड रोडवर बसवेश्वर चौकाजवळ मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत महिला नामे अरूणाबाई हनमंत टिमकेकर, वय 38 वर्षे, रा. व्यंकटेश नगर मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड** यातील नमुद आरोपीने आपले ताब्यातील कार क्रमांक एमएच–26/सिबी–7722 हे हयगय व निष्काळजीपणे चालवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी हनमंत शंकरराव टिमकेकर, वय 40 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. व्यंकटेश नगर मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं. 19/2024 कलम 304(अ),279,337,338 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री शिंदे, मो.क्रं. 9579613649** हे करीत आहेत.

## 3)फसवणुक :–

**उमरी** :– दिनांक 04.02.2023 ते दिनांक 26.05.2023 रोजी पावेतो, **सेवा कृषी केंद्र मौढा उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी कडुन तानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना या शासनाच्या योजनेतील फिर्यादी 1 ते 4 यांना मंजुर झालेले शेडनेटचे काम करून देतो मिळवुन देतो असे भासवुन त्याच्याकडून यातील नमुद तीन आरोपीतांनी प्रोसेस फि म्हणुन 80,000/–रू. तसेच प्रोजेक्ट रिपोर्टसाठी 50,000/–रू तसेच सेटनेटचे कामाचे कागदपत्र आनन्यासाठी ॲडव्हान्स म्हणुन 2,00,000/–रू. घेतले व व्याजदरामध्ये 50 टक्के कमी करण्यासाठी कर्जच्या 10 टक्के रक्कम मागणी केली. कर्जाच्या प्रोसेसिंगसाठी फिर्यादी यांचेकडून कोरे मुद्रांक बॅक अग्रिमेंट वर सहया व फिर्यादी क्र. 1 ते 2 यांचेकडून प्रत्येकी 1,00,000/–रू धनादेश सेक्युरिटी पोटी घेतले. सेटनेटचे काम करण्यासाठी प्रत्येकी 5,00,000/–रू फिर्यादीचे यांचे कडून घेतले असे एकुण 26,00,000/–रूपयाची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी किशन गंगाराम जाधव, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. बितनाळ ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं. 73/2024 कलम 420,468,470,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे मा. न्यायालयाचे आदेशाने गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री चेवले, मो. नं. 8600013355** हे करीत आहेत.

## 4)मो.सा.चोरी :–

**विमानतळ :–** दिनांक 16.02.2024 रोजी 11.00 वा. चे दरम्यान, **भुविकास बॅक कॉलनी कृष्ण मंदिराजवळ आनंदनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पेलंडर प्लस मोटार सायकल क्रमांक एमएच–26/एएम–7265 किंमती 25,000/–रूपयाची रोडवर लावलेली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने नमुद ठिकाणावरून चोरून नेली. वगैरे **फिर्यादी संतोष बालाजीराव जाधव, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. विष्णुनगर हमालपुरा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 43/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2305 आवाड, मो.क्रं. 9823350121** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**1)मुक्रामाबाद :–** दिनांक 17.02.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **पत्राचे दुकानाच्या आडोशाला राजुरा बु. ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 2000/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2391 श्री सुभाष मन्मथआप्पा सिदेश्वर, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 29/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोना/2605 पवार**, हे करीत आहेत.

**2)कंधार :—** दिनांक 16.02.2024 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **मौजे. सावरगाव निपानी .ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 1500/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2135 श्री सखाराम व्यंकटराव नवघरे, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 52/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **पोहेकॉ/1265 गिते** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड